## -: वाहतुक नियंत्रण अधिसुचना :-

**क्रमांक/नापोआ/म्हसोबा यात्रा/कक्ष-४/अधिसुचना/४६९/२०१९. नाशिक दि. ११ /०३/२०१९**

ज्या अर्थी, **दिनांक १३/०३/२०१९ ते दिनांक १५/०३/२०१९ रोजी** नाशिकरोड- दे.कॅम्प या मार्गावरील देवळालीगाव ना.रोड येथे सालाबादाप्रमाणे **''म्हसोबा यात्रा''** होणार असल्याने सदर मार्गावर वाहतूकीची कोंडी होवूनये व खबरदारीची उपाययोजना म्हणून वाहतूक मार्गात बदल करणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झाली आहे.

त्या अर्थी मी **लक्ष्मीकांत पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१/वाहतुक** नाशिक शहर. महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र एम.व्ही.ए.- ११६/सीआर/३७/टी आर दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसूचने नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून वाहतुकीची कोंडी होवु नये म्हणुन आम जनतेच्या सोईसाठी खालील प्रमाणे निर्बंध जारी करीत आहे.

दिनांक १३/०३/२०१९ ते दिनांक १५/०३/२०१९ रोजी म्हसोबा यात्रे निमीत्ताने नाशिकरोड-दे. कॅम्प या मार्गावरील जाणारे-येणारे सर्व प्रकारचे वाहनांनी खालील प्रमाणे वाहतुकीसाठी अवलंब करावा.

**वरील मार्गावर सकाळी ०८:०० ते ११:३० वा पावेतो सत्कार पॉईंट ते राजवाडा पावेतो एकेरी वाहतुक करण्यात येत आहे. तसेच सायंकाळी १६:०० ते २३:०० वा पावेतो नमुद मार्गावरील दोन्हीबाजुकडील जाणारे-येणारे सर्व प्रकारचे वाहनांना वाहतुकीसाठी बंद करण्यात येत आसुन खालील पर्यायी मार्गाचा वाहतुकीसाठी अवलंब करतील.**

**१) नाशिकरोड बिळकोकडुन दे.कॅम्प बाजुकडे जाणारी सर्व प्रकारचे वाहतुकीस खालील मार्गाचा वाहतुकीसाठी अवलंब करतील.**

- नाशिकरोड कोर्टा समोरून सुराणा हॉस्पीटल, आर्टीलरी सेंटर चौक, अण्णा गणपती मार्गे विहीतगाव सिग्नल, व देवळाली कॅम्पबाजुकडे जातील.

**२) दे.कॅम्प, विहीतगांवबाजुकडुन ना.रोड बिटको बाजुकडे येणारी वाहतुकीसाठी खालील मार्गाचा वाहतुकीसाठी अवलंब करतील.**

- विहीतगांव, मालधक्का, सुभाष रोड, रेल्वे स्टेशन, शिवाजीपुतळा मार्गे बिटकोकडे जातील.

वरील मार्ग म्हसोबा यात्रा संपले नंतर सदरचा मार्ग वाहतुकीसाठी पुर्वीप्रमाणे खुला करण्यात येईल.

**वरील सर्व प्रकारचे निर्बंध हे पोलीस सेवेतील वाहने, रूग्णवाहीका, शववाहीका व अग्निशमन दलाची वाहने यांना लागु राहणार नाही.**

वरील निर्बंध हे दिनांक १३/०३/२०१९ ते दिनांक १५/०३/२०१९ सायंकाळी १६:०० ते रात्री २३.०० वाजे पावेतो अंमलात राहतील तसेच, वरील मार्गात व वेळेमध्ये परिस्थितीनुरुप बदल करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात आले आहे.

सदरची अधिसुचना ही माझे सही व शिक्यानिशी दिनांक ११ /०३/२०१९ रोजी निर्गमित करीत आहे.

स्थळ :- नाशिक शहर.
दिनांक :-११/०३/२०१९

पोलीस आयुक्त
नाशिक शहर

**(लक्ष्मीकांत पाटील)**
**पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ १/वाहतुक, नाशिक शहर**

**प्रति,**

व्यवस्थापक, येरवडा कारगृह मुद्रणालय, पुणे -०६.

२/- आपणास विनंती करण्यात येते की, सदरची अधिसुचनेची प्रसिध्दी पुढील राजपत्रात करावी.

**प्रत सस्नेह अग्रषित :-** १) आयुक्त, म.न.पा. नाशिक २) जिल्हाधिकारी, नाशिक.

प्रत :- १) प्रादेशिक परिवहन अधिकारी नाशिक. २) जिल्हा प्रसिध्दी अधिकारी नाशिक.

प्रत. :- सर्व पो.उपा, सर्व सपोआ, सर्व प्रभारी अधि. पोठाणे/शाखा, पोलीस आयुक्तालय नाशिक शहर.